# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे...

रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचे एमएमएफ आभार मानू इच्छिते.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. साताऱ्याचे जिल्हाधिकारी श्री. अश्विन मुदगल,सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी सौ. पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ श्री. झाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम इस्पितळाच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.

साताऱ्याचे छत्रपती खा. उदयनराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी छत्रपती दमयंतीराजे भोसले यांची उपस्थिती हे या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरले. या खुर्च्या फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. ची सीएसआर शाखा असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनच्या वतीने भेट देण्यात आल्या.

या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेयर्स, पाच कमोड व्हिलचेयर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत.

मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे.

डॉ. परवेझ ग्रँट म्हणाले, या कार्याचा मला अत्यंत आनंद होतो. आम्ही साताऱ्यातील रुबी हॉस क्लिनीकमध्ये मुकुल माधव फाऊंडेशनसाठी एक खास खोली ठेवली आहे. आमचे तज्ज्ञ व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारे रुग्णांना मार्गदर्शन करतील.

या कार्यक्रमात काही सांस्कृतिक कार्यक्रम झाले. त्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांनी भाग घेतला. या दृश्याने सर्व उपस्थित भाऊक झाले.